पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७३/२०१८
दिनांक : १६/०२/२०१८

प्रति,

मा.......................................
सदस्य, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा दिनांक **२३/०२/२०१८** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२३/०२/२०१८** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – २०**

दिनांक : **२३/०२/२०१८** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२३/०२/२०१८** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक **०९/०२/२०१८ व १२/२/२०१८** रोजी झालेल्या सभेचा
**(कार्यपत्रिका क्रमांक १९)** सभावृत्तांत कायम करणे.


----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व पुणे डीस्ट्रीक्ट अमेच्युअर अॅक्वाटिक असोसिएशन यांच्या मान्यतेने व पिंपरी चिंचवड स्विमींग असोशिएशन यांचे सहकार्याने, माहे फेब्रुवारी/मार्च २०१८ मध्ये, कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम जलतरण तलाव, नेहरूनगर पिंपरी १८ येथे महापौर चषक जिल्हास्तर जलतरण स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.५,६९,०३०/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदर खर्चातील, स्टेज, मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च र.रु.८०,०००/- हा खर्च स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत स्पिकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.३०,०००/- हा खर्च विद्युत विभाग, संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु.४,५९,०३०/- हा खर्च क्रीडा विभागाचे, महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच ट्रॉफीज, सन्मान चिन्हे, मेडल्स खरेदी, पी.व्ही.सी. फ्लेक्स बॅनर, निमंत्रण पत्रिका व प्रमाण पत्रे छपाई इ. कोटेशन नोटीस प्रसिद्ध करून करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणे बाबत विचार करणे.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी अंदाजपत्रकात क्रिडा अनुदाने या लेखाशिर्षावर र.रू.३०,००,०००/- तरतुद केली जाते. पिंपरी चिंचवड म.न.पा. परिसरातील (हद्दीतील) ख-या अर्थाने मानव हिताच्या दृष्टीकोनातून काम करणा-या सर्व संस्था/ मंडळे इत्यादी मतिमंद, अपंग, अंध, कुष्ठरोगी, मुकबधीर, वृध्दाश्रम, अनाथालय इ. संस्थांना प्रत्येकी र.रू.३,००,०००/- पर्यंत अनुदान वाटप केले जाते. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन अनुदान देणेकामी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार ८ संस्थांनी अर्ज केलेले होते. सदर सर्व संस्थांचे प्रत्यक्ष जागेवर मुळ कागदपत्रांची तपासणी केली असता क्रिडा धोरणानुसार त्यापैका फक्त एक संस्था अनुदान अदा करणेकामी पात्र झालेली साई संस्कार संस्था संभाजीनगर यांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे अनुदान र.रू.२,९०,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख नव्वद हजार फक्त) अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणे बाबत विचार करणे.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, आंतर शालेय ८ कला व गिर्यारोहण स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेस व त्यानुषंगाने, विद्यार्थ्यांना द्यावयाचा खाऊ=बिस्किटे/केळी खरेदी, कला व गिर्यारोहण स्पर्धा पुस्तिका छपाई, चित्रकला कागद खरेदी, फ्लेक्स बॅनर, ट्राँफ़िज, निमंत्रण पत्रिका व प्रमाणपत्र छपाई इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिद्ध करून खरेदी करणेस तसेच प्रेक्षागृह भाडे, पी.एम.पी.एम.एल.बस भाडे कामी येणा-या अंदाजे खर्च र.रू.५,४९,३९२/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदर खर्च क्रीडा निधी मधील, वार्षिक स्पर्धा, क्रीडा कला व क्रीडा कला साहित्य खरेदी या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस, तसेच चित्रकला, लेझीम व गिर्यारोहण या स्पर्धा अनुषंगाने स्टेज, मंडप टेबल, खुर्च्या इ. खर्च स्थापत्य विभाग, संबंधित प्रभाग व विद्युत स्पीकर, माईक व्यवस्था खर्च विद्युत विभाग, संबंधित प्रभागातून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणे बाबत विचार करणे.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पुना डीस्ट्रीक्ट फुटबॉल असोसिएशन चे व वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन यांचे मान्यतेने व आरंभ सोशल फौंडेशन, चिंचवड स्टेशन, पुणे सहकार्याने, महापौर चषक राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा २०१७-१८ या माहे फेब्रुवारी/मार्च २०१८ या कालावधीत राजर्षी शाहू महाराज क्रीडांगण शाहूनगर, चिंचवड १९ येथे आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.२३,५०,५००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदर खर्चातील, स्टेज, मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च र.रु.६,०८,०००/- हा खर्च स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत स्पिकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.५,००,०००/- हा खर्च विद्युत विभाग, संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु.१२,४२,५००/- हा खर्च क्रीडा विभागाचे ,महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच ट्रॉफीज, सन्मान चिन्हे, मेडल्स खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, क्रीडा साहित्य खरेदी, निमंत्रण पत्रिका व प्रमाण पत्रे छपाई इ. कोटेशन नोटीस प्रसिद्ध करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणे बाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७३/२०१८
दिनांक : १६/०२/२०१८ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.